दिनांक १५/०९/२०२०

# प्रसिध्दी पत्रक

**१) आरोपी लोकसेवक दिलीप कारभारी तेजीमकर, वय ४८ वर्षे, पद- पोलीस नाईक, नेमणुक- पोलीस ठाणे दौलताबाद, ता. जि. औरंगाबाद २) शेख फारुख शेख युनुस, वय -३२ वर्ष, व्यवसाय- भंगार खरेदी विक्री यांनी ७०,०००/- रु लाच स्विकारल्याने ते लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या जाळयात**

| | | |
|---|---|---|
| आरोपी लोकसेवकाचे नांव हुद्दा व पत्ता | :- | १) आरोपी लोकसेवक दिलीप कारभारी तेजीमकर, वय ४८ वर्षे, पद- पोलीस नाईक, नेमणुक- पोलीस ठाणे दौलताबाद, औरंगाबाद शहर. रा. फ्लॅट नंबर १२, रघुवीर अपार्टमेंट, सुयोग कॉलनी, पदमपुरा, औरंगाबाद. २) शेख फारुख शेख युनुस, वय ३२ वर्ष, व्यवसाय- भंगार खरेदी विक्री, रा. दौलताबाद, ता. जि. औरंगाबाद. |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे दिनांक | :- | पोलीस ठाणे दौलताबाद, औरंगाबाद शहर येथे गुन्हा दाखल करण्याचे काम सुरु आहे. |
| ठिकाण | :- | बब्बुभाई गॅरेज, माळीवाडा चौफुली, ता. जि. औरंगाबाद |
| लाच स्विकारली रक्कम | :- | ७०,०००/- रुपये. |
| लाच मागण्याचा हेतु | :- | तक्रारदार यांचे विरुध्द भंगार चोरीचा माल खरेदी केला म्हणुन गुन्हा दाखल न करण्यासाठी. |
| तपासी अधिकारी | | श्री. नंदकिशोर क्षीरसागर, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद. |

**तक्रारीचे थोडक्यात स्वरुप :-** यातील तक्रारदार यांचेविरुद्ध भंगार चोरीचा माल खरेदी केला म्हणुन गुन्हा दाखल न करण्यासाठी यातील लोकसेवक श्री. तेजीमकर, पोलीस हे तक्रारदार यांचेकडे ७०,०००/- रुपये लाचेची मागणी करत असल्याबाबतची तक्रार तक्रारदार यांनी अॅन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद कडे तक्रार दिली होती.

सदर तक्रारीचे अनुषंगाने लाचेच्या मागणीची शहानिशा केली असता, यातील लोकसेवक श्री.तेजीमकर, पोलीस यांनी तक्रारदार यांचेकडे ७०,०००/- रुपये लाचेची मागणी केली. त्यानंतर तक्रारदार व लोकसेवक यांचे मध्यस्थ बब्बु ऊर्फ फारुख शेख (खाजगी ईसम) यांचेकडुन ५०,०००/-रुपये लोकसेवक यांनी परस्पर स्विकारुन, उर्वरीत २०,०००/-रुपये लाचेची रक्कम तक्रारदार यांना माळीवाडा येथे घेवुन येण्याचे सांगीतल्याचे निष्पन्न झाले.

त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद तर्फे आज दिनांक १५/०९/२०२० रोजी वर नमुद ठिकाणी सापळा लावण्यात आला असता, आरोपी क्र. ०१ यांचे सांगण्यावरून आरोपी क्र. ०२ यांनी २०,०००/- रुपये लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर दोन्ही आरोपींना ताब्यात घेण्यात आले आहे. दोन्ही आरोपी विरुद्ध पोलीस ठाणे दौलताबाद, औरंगाबाद शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदर कारवाई, पोलीस अधीक्षक मा.श्री.अरविंद चावरिया, अपर पोलीस अधीक्षक मा.डॉ.अनिता जमादार, पोलीस उपअधीक्षक बी. व्ही. गावडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री नंदकिशोर क्षीरसागर यांनी केली आहे. त्यांना पोह/ गणेश पंडुरे, पोना/विजय बांम्हंदे, पोशि/विलास चव्हाण, चापोशि बागुल यांनी मदत केली आहे.

**तक्रारदार यांच्याप्रमाणे नागरीकांनी भ्रष्टाचारासंबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे, असे आवाहन मा. पोलीस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद यांनी केले आहे.**

**फोन क्रं. ०२४०-२३४४०५०, टोल फ्रि क्रं. १०६४**

**EMail ID** :-1) sp1acbaurangabad@gmail.com, 2) spacbaurangabad@mahapolice.gov.in

पोलीस उप अधीक्षक कार्यालय अॅन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद
सत्यमेव जयते

(बी.व्ही.गावडे)
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग
औरंगाबाद.

